# रामायण

अयोध्या नगरीतील हजारो वर्षापूर्वीची गोष्ट. हजारों मैल पसरलेल्या भू-खंडाला वेड लावणारी, दु:खितांना सुखी करणारी, नास्तिकालाहि आस्तिक बनविणारी अगतिक झालेल्यांना मार्गदर्शन करणारी गोष्ट. दिव्यत्वाचा साक्षात्कार घडविणारी परमपावन मंगलमय गाथाच ती ! दिव्यदाहक तत्त्वें अत्यंत तेजस्वीपणें सांगणारी मानवतेचा मानदंड ठरणारी दिव्यरुपधारी ही कथा!

प्रभातीचं पावित्र्य जणूं अंथरुणावरुन जागं झालं होतं. पक्ष्यांच्या मधुर आलापांत मानवी गायक-गायिकांचे, स्वरकिन्नरींचे आवाजही मिसळले गेले होते. घराघरांतून सोऽहं ध्वनीचा मंगलरव येत होता. भौतिक जीवनाबरोबर मंगलमय आत्म्याच्या विराग-सनातन-शांत स्वरुपाची ओळख करनु घेणारे अयोध्यावासी जागृत झाले होते. अयोध्येला एक स्वप्न पडलं होतं. त्या स्वप्नांत अयोध्येत एका नव्या विभूतीला पृथ्वीवर येतांना पाहिलं होत. अयोध्येचे राजे दशरथ हें आपल्या अंगभूत गुणांनी पृथ्वीचे पालन करीत होते. दातृत्वांत त्यांचा हात धरणारा कुणी नव्हता. शत्रुलाहि जिवंत ठेवून त्याच्या गुणांचा उपयोग आपल्या राज्य -कारभारासाठी करुन घेण्याची त्यांची किमया कांही औरच होती. भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान करण्याचे व्रतच त्यांनी घेतले असावे असे वाटत होते. पराक्रमाने सिंहासारखे तं असले तरी साधुसंतांच्या सहवासांत मृदूनि कुसुमादपि ते होते. दशरथांची कीर्ति षट्खंडातहि पसरली होती.

प्रजाजनांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिक म्हणजे राजा ही आचार्योक्ति त्यांची प्रत्यक्षांत उतरविलेली होती.

अशा राजाला मात्र एकच हुरहुर होती. ती म्हणजे तो आंतापर्यंत निपुत्रिक राहिला होता. आकाशांत तारका नसाव्यांत, वेलीला फुलं नसावीत, सरोवरांत कमळं नसावीत, मेघात पाणी नसावं, सिंहाला म्हातारपण यावं, मातेला दूध नसावं अशी त्या राजाची स्थिती होती. घरोघरी गोंडस मुलें खेळतांना पाहून राजाची स्थिती मोठी चमत्कारिक होत असे. मुले म्हटली की तो वेडा होई. राजाचं वय जसं जसं वाढत चाललं तसं तसं मूल नसल्याचं दु:ख फारच जाणवू

लागलं.  राजा दु:खी झाला, निराश झाला.  राज्यकारभार करण्यांत त्याला उत्साह वाटेना! काय करावं हे कळेना !

आणि एका भल्या पहांटे --------- कौसल्या राणीने दशरथाला जागं केलं.  राजानं विचारलं ------- इतक्या भल्या पहाटे आणि इतकी आनंदित ! काय बातमी आहे ? अयोध्यावासियांचे स्वप्न साकार होणार आहे कीं काय ? राणी लाजेने खाली पाहू लागली. कौसल्या आनंदाने बेहोष होती. कस सांगावं ? काय सांगावं? हेच तिला कळेनातरी पण ती हळूच म्हणाली, -

नाथ, अगदी पहाटे मला एक स्वप्न पडले. एक अत्यंत सुंदर व पांढरा हत्ती डौलानं चालत चालत माझ्याकडे आला आणि अत्यंत नम्रपणे त्याने आपले दोन्ही गुडघे टेकविले. त्याच्या सोंडेत कमलपुष्पे होती. सोंड उंचावून ती कमलपुष्पे त्याने माझ्या शिरावर ठेवली. मी तर अगदी घाबरुन गेले होते बाई. त्यानंतर थोडी गुलाबी झोप लागते न लागते तोच एक आक्राळ विक्राळ सिंह पण अत्यंत नम्रपणे माझ्याकडे सारखा पाहात होता. त्याचा चेहरा अगदी शांत होता. सिंहासारखा पराक्रमी प्राणी, पण तो देखील अगदी गोगलगाय झालेला होता. चेहऱ्यात तुमच्या गुणांची छटा उमटलेली दिसत होती. नंतर तो अदृश्य झाला.

तिसर स्वप्न पडल ते उगवत्या सूर्यांचे. कितीं मनोहर बिंब होते ते. सार आकाश रक्तिमेन सारवल्यासारख दिसत होत, सूर्याचे ते रुप अगदी माझ्या जवळ जवळ आले. जणू त्या सूर्याला मी उदरात प्रवेश करतानाच पहात होते. माझ शरीर त्याच्या कांतीने तेजस्वी दिसूं लागले मला.

त्यानंतर एक चन्द्राचे मनोहर बिंब दिसले. असंख्य चमचमणाऱ्या तारकांत चन्द्राचे ते दिव्य-शितल बिंब किती मनोहरी दिसत होते आणि मी त्या चन्द्राकडे निरखून पाहिले तर तिथं तुमचंच रुप मला दिसू लागल.

असं सांगतांना ती लाजत होती. तेंव्हा महाराज दशरथ म्हणाले, ही सारी स्पप्ने ऐकून मला अस वाटंत की, आपल्या घरी चार पुत्र जन्माला येणार आहेत. तुझ्या पोटी तर अखिल भारताला दिव्यरुपान, गुणान, अलौकिकतेन दिपवून टाकणार पुत्र जन्माला येणार आहे सर्व जागांतील मानवतेची धारणा करणारा, क्षात्र धर्म सांगणारा, दुष्टांचा नाश करणारा, आत्मविकासाचा मार्ग सांगणारा महादिव्य पुरुष जन्माला येणार याचीच सूचक ही स्वप्ने आहेत.

मी तर बाई घाबरुन गेले होते. तुमच्या सान्निध्यांत मला धीर आला. आता मी कसं वागावं ते तरी सांगा.

कौशल्ये, भारताला नवा नेता देणारी आई तूं होणार आहेस. दशरथाची पत्नी होण्यापेक्षां या जगद् -वंद्य भारताच्या नेंत्याची तूं आई व्हावीस व मुलाची आई म्हणूनच तुला जगानं ओळखावं असं मला वाटते. कदाचित् इतक्या थोर पुत्रांचा पिता व्हायला मी लायक नसेन ; पण तूं मात्र खास लायक आहेस.

हे काय बोलणं, तुमच्यासाठीच मी जिवंत आहे. तुम्हीच नाही का अयोध्येचा मान-लौकिक जगांत वाढविला. रघुकुळाला जो मोठेपणा प्राप्त णाला तो तुमच्यामुळेच नाही का? मुलाची माता होण्यापेक्षांहि तुमची अर्धांगी राहण्यांत माझं सौभाग्य नाही कां ? सौभाग्य की मातृत्व असा जर माझ्यापुढें प्रश्न आला तर, मी सौभाग्यच नाही कां पसंत करणार ? भारतीय संस्कृतीचं, रघुकुलाच्या प्रतिष्ठेचं हेच प्रतिक नाही कां ठरणार?

त्यानंतर मात्र अयोध्येत आनंदाचं साम्राज्य पसरलं अयोध्येला एक नव्हे तर चार राजपुत्र लाभणार होते. महाराजे दशरथ पुत्रवान बनणार होते नऊ महिने नऊ दिवस होईपर्यंतचा काळ चारहि राण्यांनी अत्यंत धर्मपूर्ण कार्यात घालविला. आनंदी आणि समाधानी राहून ते दिवस त्यांनी घालविले. त्या दिवसात राज अर्हत् देवाची उपासना, आत्मदेवाची चर्चा आणि गरीबांना भरपूर अन्न आणि वस्त्रदान इत्यादि कार्यात त्या चारहि राण्या गढून गेल्या.

एका अत्यंत मंगल समयाला चैत्र शुध्द नवमीच्या दिवशी श्रीरामाचा जन्म झाला. जन्माची वार्ता कळताच गांवोगांवी साखर वाटण्यांत आली. वस्त्रदान, सूवर्णदान, अन्नदान या तीन दानांनी भारतांतील दारिद्र पळून गेलं. उत्सवांना तर ऊत आला. श्रीरामाच्या दर्शनासाठी जणूं सूर्यदेव बराच काळ तिष्ठत हेते. श्रीरामाच्या जन्मानं जणूं भारतातील भाग्य उदेलं होतं. शौर्य आणि पराक्रमाच जणूं जन्माला आले होते. पावित्र्य आणि मांगल्याचा आश्रयभूत व्यक्ति लाभली होती. श्रीरामाचे मुखपर्शन घ्यायला गांवांतील सुवासिनींची रीघ लागली होती. राजरस्ते रंगीबेरगी पोषाखांनी भरुन गेले होते. साडासंम्मार्जनांनी व लतामंडपांनी आगळीच शोभा गांवांत निर्माण झाली होती. चौघडे निनादत होते. सनया वाजत होत्या. घुंघुराच्या आवाजानं रानातील मोरहि नृत्य विसरू न गेले होते.

श्रीरामाच्या जन्माच्या वेळीच सुमित्राराणीला श्रीलक्ष्मण, कैकयीपासून श्रीभरत व सुप्रभेपासून शत्रुघ्न अशी तीन मुले जन्माला आली होती. रघूवंशातील मुंले चारही दिशा जिंकून आपल्या वंशाची कीर्ति चारही दिशेला पसरवतील अशी भविष्यवाणी कुणी त्यावेळी केली असेल तर त्यांत नवल काय? श्रीदशरथ राजे तर या आनंदातिरेकाने बेभान, बेहोष झाले होते. रघुकुलाचा वंशच खुंटतो कीं काय असे जे त्यांना वाटत होते, ती काळजी आता दूर झाली होती.

श्रीराम ज्या वंशात जन्माला आले, त्याला इक्ष्वाकु वंश म्हणतात. हा वंश अत्यंत प्राचीन आहे. भगवान श्रीवृषभ यांच्या काळापासून या वंशाने अनेक अजेय पुरुष निर्माण केले. त्यांतीलच रघू हा होता. रघूने जे दिव्य आयुष्य कंठिले त्यावरुनच लोक रघवंश म्हणून संबोधू लागले. वरील वंशाची परंपराच अशी असे की, मुले वयात येईपर्यंत त्यांना उत्कृष्ट गुरुंच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण द्यावयाचे व ती मोठी व कर्ती झाली की पित्याने राज्य त्यांना देऊन जनतेची सेवा करीत करीत आत्म्याची उपासना करायची.

रघू राजाला अरण्यापुत्र नावाचा मुलगा झाला. तो वयात आल्यावर त्याचे पृथ्वीमती नावाच्या अत्यंत रुपवति मुलीबरोबर लग्न झालं. तिच्यापासून त्याला अनंतरथ व दशरथ अशी दोन पराक्रमी मुले जन्मली. अनंतरथ हा मुळचाच अत्यंत वैराग्यशील व आत्मज्ञानी होता. भैातिक सौख्यापरंपरेला साजेल असे राज्यपद सांभाळण्यात आयुष्य घालविण्यापेक्षा ज्यामुळे स्वत:चे कल्याण होईल, आत्मज्ञानी होईल, कैवल्यसिध्दी होईल तेच करण्याकडे त्याचे लक्ष होते. परंतु कुलपरंपरेला बाधा न आणता वडिलांच्या इच्छेप्रमाणे त्याने राज्याची जबाबदारी काही दिवस स्वीकारली. नंतर वडिलांनी जो अरण्यवास पत्करला त्याच मार्गाचा तो स्वत: अनुयायी झ ाला. वनाचा मार्ग धरतांना तो दशरथाला म्हणाला, प्रिय बंधुवर, आपल्या कुळाला दोन गोष्टींनी कमीपणा आणूं नकोस. पहिली गोष्ट शत्रुला पाठ दाखवून रणांतून परतूं नकोस व दुसरी गोष्ठ परस्त्रियांचा अनादर होईल अशी कोणतीही गोष्ट राज्यांत घडूं देऊ नकोस. भारतीय संस्कृतीचे हे दोन विशेष आहेत असे समज. रघुकुलांतील माणसे या दोन गोष्टीसांठी प्राण देतील असे कर.

दशरथाने भावाचे म्हणणें  मान्य केले.  अनंतरथ जंगलात गेला.  तेथे त्याला झाडाखाली बसलेले मुनी दिसले.  त्याच नाव अभयसेन होत.  त्यांना पहाताच अनंतरथानं त्यांच्याजवळ राहून मुनिधर्माचा अभ्यास केला व तो मुनी झाला.

दशरथाला भारताच राज्य मिळाल.  आपल्या गुणवत्तेन आणि पराक्रमान त्यान प्रजेला धर्म आणि निती यांचा मार्ग सोडू दिला नाही.  जनतेच्या हिताची कार्ये करण्यात व शत्रुंना जिंकण्यात त्यांच तारूण्य कस गेल, हे कळल देखील नाही.  त्यान चार लग्न केली होती तरी परंतु त्याला मूल-बाळ नव्हते आणि त्यामुळे त्याला एक प्रकारची काळजी निर्माण झाली होती.  पण श्रीरामाच्या जन्मान दशरथाची ती काळजीही दूर झाली होती.  जे होणार असते त्याला केवळ मानवी प्रयत्नच उपयोगी पडत नाहीत.  या अखि ब्रम्हांडात असे एक तत्त्व भरुन राहिलं आहे की जे सहजासहजी कुणाच्याही लक्षात येत नाही.  जीवनाला कांही अर्थ आहे व ते जीवन अनासक्तीने जगण्यांत आनंद आहे याचा अर्थ प्रत्यय राजा दशरथाला येत होता.

अनेक वर्षे राज्य केले, अनेकांशी युध्दे केली, अनेक राजांना मांडलिक बनविले, काहींना मित्रही केले; पण हे करीत असता आपल्या रघुकुलाची रीत विसरला नाही.  युध्दापुरतं शत्रुत्व आणि इतर वेळी  माध्यस्थवृत्ति  त्याने टाकली नाही.  दशरथाच्या राज्यात प्रजेला सुख लाभलं, वैभवसंपन्नता प्राप्त झाली.

अशाच एका युध्दाच्या प्रसंगाची गोष्ट.

कौतुकमंगल नावाच्या शहरामध्ये राजा शुभमति राहात होता.  त्याला कैकयी नांवाची अत्यंत रुपवती मुलगी होती.  एकुलतीच मुलगी असल्याने सर्व विद्येत तिला पारंगत केले होते. न्याय, वैशेषिक, सांख्य, वेदांत इत्यादि शास्त्रांत ती अत्यंत तरबेज होती.  जशी तिची बुध्दी कुशाग्र तशी ती युध्दशास्त्र निपुणही होती.  रथ-शास्त्रात तिचा हात धरणारा कुणी नव्हता.  एका वेळी अनेक शत्रूंशी सामना देण्यांत ती पटाईत होती.  अश्वविद्या, गजविद्या, धनुविद्या आणि अस्त्रविद्या यांत ती निपूण होती.

ती वयांत आल्यावर अनेक राजांनी तिच्यासाठी मागणी घातली. तेंव्हा तिच्या वडिलांनी विचार केला की हिचे लग्न स्वयंवर पध्दतीने व्हावे. झालं. देशोदेशीचे राजे आले. प्रत्येकाला वाटे आपल्या वैभवाने आपण मुलीला जिंकू; पण कंकयी चतुर व चाणाक्ष होती.

याच वेळी राजा दशरथही हिंडत हिंडत तेथे आला होता. त्याच्या स्वप्नांतहि कल्पना नव्हती की, असे कांहि घडणार आहे. गावातील उत्सव पाहण्यासाठी तोही सहज तेथे आला. तेंव्हा त्याला कळले की गावात स्वयंवर आहे. दैव माणसाला कसे ओढून नेते याचे प्रत्यंतर त्याला आले.

दशरथही स्वयंवर मंडपात केवळ गम्मत पहाण्यास आला होता. दशरथाचे रुप दिव्य व अलौकिक होते. त्याला पाहताच कैकयीच्या मनात कुतुहल निर्माण झाले. पूर्वजन्मीचे ऋणानुबंधच असे असतात! कैकेयीने त्याच्याकडे पाहिले आणि तिच्या हृदयात प्रेमाचा अंकुर फुटला. जणू अनेक वर्षे ती याच माणासाची मार्गप्रतिक्षा करीत होती. दशरथ वयाने मोठा होता. तसे पाहिले तर अनेक तरणें-ताठे नवजवान तेथे आले होते. पण कैकेयीच्या मनांने दशरथाला वरले होते. माळ घेऊन ती हिंडत हिंडत दशरथाजवळ आली व तिने त्याच्या गळयात माळ घातली. माळ घालतांच दशरथाने तिला जवळ केली. इतर राजे लोक त्यामुळे चिडले. वडिलांनाहि पत्ता नाही की, हा राजा कोण आहे म्हणून. शेवटी राजे दशरथावर चाल करुन गेले. दशरथानें कैकेयीकडे रथाचे सारथ्य दिले व तो इतर राजांबरोबर युध्द करुं लागला. एका राजाने दशरथाच्या रथाच्या चाकाची खीळच उडवली. त्यामुळे रथ खाली कोलमडणार होता; हे राणी कैकेयीच्या लक्षांत आले. तिने आपली करांगळी घालून रथाचा बचाव केला आणी ते दोघे सुखरुप आयोध्येला परत आलें. यामुळे राजा दशरथ तिच्यावर फारच खुष झाला व तो म्हणाला, लाडके, तू माझा प्राण वाचविलास. मी तुझ्यावर खुष आहे. जरी तू माझी आवडती राणी असलीस तरी तुझ्यासाठी मी दोन वर देतो. तुला काय पाहिजे ते माग.

त्यावर ती म्हणाली, तुम्हीच माझे असतांना असे कां बरे म्हणता. तुम्ही असतांना मला काय उणें आहे. मी तर सर्वस्वी तुमचीच ना !

तरीही दशरथाने तिला गळ घातली. तेंव्हा ती म्हणाली, आज तर मला सर्वंच मिळालं आहे; पण प्रसंग पडला तर मात्र तुम्ही दिलेले हे वर मी मागून घेईन. मग मात्र शब्द फिरवू नका म्हणजे झाल !

छे ! छे ! कैक्येयी, आमच्या कुळांतील ही रीत नाही. भगवान वृषभनाथापासून जोपर्यंत माझ्या रक्ताची संतति जिवंत आहे, तोपर्यंत दिलेला शब्द परत घेण्याची रीत मोडणार नाही. कैक्येयी मानवी जीवनाला जिवन तेव्हा प्राप्त झाले जेंव्हा त्याला शब्द साकार करता आले. आमची संस्कृति, आचार-विचार, धर्म हे त्या आदिजिनेश्वरांनी सांगितलेल्या शब्दावर अवलंबून आहे. अखिल मानवजातीचे सुख शब्दावर अवलंबून आहे. त्या शब्दांना ज्या वेळी उरणार नाही तेंव्हा मानवजात हिंसा, असूया, द्वेष, मत्सर यांच्या अग्नीत लोप पावेल. आमच्या वंशात असे घडले नाही व घडणार नाही. व्यक्तीच्या हितापेक्षां प्रजेचे हित, कुलाची अब्रु ही महत्वाची गणली जाईल, हाच संदेश आमच्या पूर्वजांनी दिला आहे. कैक्येयी, मी जिवंत असेपर्य्ंत हे वर मी द्यायला बांधलो आहे. माझ्या पश्चात माझी मुले तुझी आकांक्षा पुरी करतील.

कैक्येयीला आनंद झाला. तशी ती पोरसवदा होती. जग काय आहे? हे तीला माहीत नव्हते. तिचा अल्लडपणा कायम होता.

आतां वरील गोष्ट घडून अनेंक वर्षे गेली होती. भरतासारख्या गोंडस, बलवान, पराक्रमी बुध्दिमान आणि अत्यंत प्रेमळ असा पुत्र तिला झाला होता. भरताच्या संगोपनाची जबाबदारी तिने स्वत:वर घेतली होती. आपल्या सर्व गुणांचा वाटाच जणू तिने भरतास दिला होता. चारही भाऊ एकत्र खेळ्त, शिकत, हसत-रडत आणि भांडतही असत. पण भरताचे लावण्य औरच होते. भरताला रामाशिवाय करमत नसे आणि लक्ष्मणाला तर श्रीराम जीव का प्राण वाटे अनेक विद्या शिकतांना दिवस कसे निघून गेले, हे कळाले देखील नाही.

श्रीरामाचे प्रेम कैक्रेयीवर फार. तिच्याकडून पूर्वजांच्या कथा ऐकण्यात त्याला फार गोडी वाटे. एखादे दिवशी श्रीराम भेटला नाहीं तर कैक्रेयी कावरीबावरी होई. मानवी जीवनाची गुंतागुंतच अशी असते की काय कोण जाणें ! ज्यावर ममता अधिक करावी तो वैरी बनावा, जे जे आवडावे ते ते विषारी बनावे, जे जे हवेसे वाटावे ते दूर पळत जावे, हीच का नियती ! हे काय आहे? कदाचित् सृष्टिच्या अंतापर्यंत हे प्रश्न अनिर्णित राहतील आणि निर्णित झाले तर जीवनाची मजाच नाही का निघून जाणार ? हे जे गुढ, अनाकलणीय आहे त्यातच रम्यता आहे. त्यांतच जीवनाचा सार साठवला आहे.

चारही भाऊ चंद्राची कोर ज्याप्रमाणे वाढत जाते, तिचे तेज विलसत जाते, ती जशी दिवसेंदिवस नयाभिराम बनते तसे ते वाढू लागले. कळी उमलून फूल झाल्याशिवाय तिचा दरवळ पसरत नाही. श्रीरामाच्या सहवासात चारही भाऊ विकसू लागले.

श्रीरामाचा रग सावळा होता; पण डोळेमात्र काळेभोर होते. भावविवश नेत्रांतून जणू मानवतेचा साक्षात्कार घडत होता. गुरुजनांचा आदर, वडिलांसंबंधीची कृतज्ञता बुध्दि, कुलांच्या रीति आणि रिवाज पाळण्यांत तत्पर, प्राणपणाने तत्वासाठी लढण्याचा निर्धार, दानवी प्रवृत्तिचे निर्दालन करण्याइतकी खंबीर मनोरचना, यांचा पिंड म्हणजे राम होता. मनावरील निग्रह वाचेची रसाळ्ता आणि कृतीतील मार्दव आणि शरीरिकसौष्टव व बांधेसूदपणा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व इतर भावापेंक्षा उठून दिसत होतं. आपलं घराणं, आपल्या घरण्यातील थोर व्यक्ति आणि कुलाचारासंबंधी काटेकोरपणा त्यांच्यासंबंधी कमालीचा आग्रही होता तो. देव आणि देश, धर आणि धरित्री, माता आणि पिता, धर्म आणि आचार यांच्या संबंधीच्या फारच उच्च आशा व आकांक्षा त्याच्या मनांत तयार झाल्या होत्या.

श्रीलक्ष्मणाची जगण्याची रीतच वेगळी होती. एखाद्यावर प्रेम करावे ते लक्ष्मणानेच बंधुभावाचा खरा आदर्श लक्ष्मणच होता. शरीराने अत्यंत बलिष्ठ, धष्टपुष्ट, खोल व गंभीर डोळे, जाड भुवया, खंबीर आणि रुंद असे खांदे यामुळे तो रामापेक्षांही अधिक बलवान दिसत असे. अन्यायाची चीड त्याला फार, कुलापेक्षा आपल्या रामावर त्याचे अतोनात प्रेम. एखादे वेळी सूर्य

पूर्वेची संगत सोडून पश्चिमेकडे जाईल.  पण श्रीलक्ष्मणाचे मन रामापेक्षा दुसरे काहिच चिंतत नसे.  रामाची अनंत काळची सावली, अनंत विश्वाला गवसणी घालेल असे दिव्य सामर्थ्य असलेला लक्ष्मण त्याच्या चरणी नतमस्तक होई.  राम म्हणजे त्याचे जीवन.  रामापलिकडे त्याला अन्य कांही आवडत नसे.  श्रीरामाचे दिव्य कवचच जणुं श्रीलक्ष्मणाच्या रुपाने जन्माला आलें होते.

भरताचा जन्म कैक्रयीसारख्या सुंदर स्त्रीच्या पोटी झाल्यामुळें भरत अगदी कामदेवाप्रमाणे सुंदर दिसत होता.  पण त्या सौदर्यंचा मोह त्याला पडू शकला नाही.  त्याचे विचारच पहिल्यापासून आध्यात्मिक होते.  वडीलांवर होते.  म्हणायला त्याची आई कैक्रयी पण त्याला कौसल्यचा लळा होता.  भरताशिवाय कैक्रयी म्हणजें पाण्याशिवाय मासा.  रोज भरत भेटलाच पाहिजे तिला.  याच्या उलट श्रीरामावर प्रेम कैक्रयीच.  तो तिला भारीच आवडायचा.  अशा रीतीने दशरथाचं घर म्हणजे एक गुंतागुंत होती.

मुलें मोठी झाली म्हणजे त्यांचा विवाह करावा.  त्यांना संसार थाटून द्यावा, त्यांच्या जीवनाला नवीन पालवी फुटावी, त्यांचीही जीवनलतिका बहरावी अशी इच्छा आई-वडीलांना निर्माण झाली तर त्यास कांही नवल नाही.  दशरथानं आपल्या चारही स्त्रियाचा विचार घेतला. त्यात कैक्रयीचा विचार घेणं अत्यंत आवश्यक होतें.  कारण रामावर तिचं अत्यंत प्रेम.  पोटच्या मुलापेक्षांही जास्त.  कैक्रयीनं खूप मनसुबे रचले होते.  मुलाच्या सुनेचे कसे कोड कौतुक करायचे, कोणते अलंकार तिला द्यायचे हे देखील तिनं मनाशी फार फार ठरवलं होतं.

मिथिला नावाचं एक फार मोंठ शहर होतं.  त्या शहरांत राजा जनक राज्य करीत होता. त्याच्या राणीच नाव होत विदेही.  तिला एके दिवशी दोन मुले झाली होती.  एक होता मुलगा आणि दुसरी होती मुलगी.  ज्यावेळी ती प्रसूत झाली त्यावेळी एका दुष्ट विद्याधराच्या मनात आले की मुलाला पळवाव व त्याने मुलाला पळवून नेले.  विदेहीला फार दु:ख झाले.  काय करावे हे सुचेना! ती अगदी दिङ:मूढ झाली.  पण दैवगति विचित्र! शेवटी जनकान तिची समजूत घातली. जनक हा मुळचाच शांत स्वभावाचा होता.  भारतातील थोर राजात त्याची गणना होत होती. मुलगा गेल्याच त्यालाहि दु:ख झाल.

मुलीच नाव त्याने सिता ठेवले.  दोघांच दु:ख शांत करणारी म्हणून ते नाव ठेवल असाव. प्रेमाने तिला जनक राजाची मुलगी म्हणून  जानकी  म्हणत किंवा आईच्या नावावरुन तिला वैदेही म्हणत.  सीतेचे लाड जितके केले गेले असतील तितके कुणाचेच झाले नसतील.  एकुलती एक मुलगी आणि त्यात अत्यंत सुंदर! सुकुमार म्हणाव तर युध्दकलेत ती निपूण होती शस्त्रविद्येचा अभ्यास स्वत: जनकराजाने तिच्याकडून करवून घेतला होता.  हत्तीवर बसून युध्द करणे, घोडयावर स्वार होणे, धनुष्य बाणांचा उपयोग करणे, रथ चालविणे, इत्यादि सर्व प्रकारच्या क्षत्रियांना उचित अशा कर्मामध्ये ती अग्रगण्य होती.  सीता म्हणजे एक दिव्य रत्न होते.  आणि हे हव हवस वाटण शक्य होत.  देशोदशीचे राजकुमार तिच्याशी आपला विवाह व्हावा म्हणून हट्ट घेऊन बसले होते.  मागण्यावर मागण्या येत होत्या.  काय करावे हे मात्र जनकाला सुचत नव्हते. एकुलती एक मुलगी आणि तिचं लग्न हाच एक विषय त्यांच्या डोक्यांत होता.  दोघांना काळजी पडली.  कुणाला द्याव अन् कुणाला देवू नये?

तस पाहिल तर श्रीजनकाच मत होत श्रीरामाला आपली मुलगी द्यावी. कारण अस की जनकाच आणि दशरथाच प्रेम फार पूर्वी पासूनच होत.  दोन्ही घराणी उच्च प्रतीची आणि जैनधर्मीय होती भारतीय उच्चतेचे आदर्श दोघांच्याहि घरात आचरिले जात होते.

शिवाय आणखी एक घटना अगदी ताजी होती जनकाच्या मनांत.  गेल्याच वर्षी जनकाच्या मिथिलेवर एका बलाढय म्लेच्छ राजान फार जोरान आक्रमण केल होत.  कोणताहि क्षत्रिय पुरुष आक्रमण कसा सहन करील? लहानशी मुंगी देखील पाय पडला तर जोरान चावा घेते.  मग इथे तर राजा जनकासारखा पराक्रमी पुरुष! त्यानंही त्याच प्रकारंच प्रत्याक्रमण केल. या युध्दात त्यान राज दशरथाला भाग घेण्यासाठी बोलविल होत.

पण राजा दशरथ जेंव्हा सैन्य घेऊन जायला निघाला त्यावेळी श्रीराम व श्रीलक्ष्मण यांनी सांगितलं होतं---------

पिताजी, या वयात आपण युध्द करावं आणि आम्ही मात्र घरात बसाव हे क्षत्रिय रक्ताला शोभून दिसत नाही. आपण जर परवानगी द्याल तर या युध्दात आम्ही भाग घेऊ इच्छितो आपले दिवस विश्रामाचे आहेत. शिवाय आपल्या मंगल आशिर्वादाने प्राप्त झालेल्या युध्दविद्येच्या परीक्षेची वेळ आहे. आपण आपल्या सन्माननीय मित्राला कळवा की, माझी बलवान मुलें मी पाठवित आहे. मी रघुकुलाला कलंक लागेल असे काहीही होऊ देणार नाही. जिथे मनात धर्म आहे आणि हातात पराक्रमी शस्त्र आहे आणि पाठीशी आपल्यासारख्या थोर पुरुषांचा मंगल आशीर्वाद आहे तिथे आमचाच जय होणार आहे.

वडीलांना मुलांचे कौतुक वाटले. पण लहान वयात त्याना युध्दावर पाठविण्याचे धैर्य त्यांना होईना. पण मुलांच्या हट्टापुढे त्यांचे काहीच चालले नाही. वडिलांच्या डोळ्यात आसवे होती. मुलांच्या शब्दांनी त्यांचे ह्रदय भरुन आले होते. त्यांनी मुलांना परवानगी दिली. इतक्या मोठया युध्दावर जाण्याचा श्रीरामाचा पहिलाच प्रसंग होता. श्रीरामाने त्या युध्दांत पराक्रम गाजवून म्लेच्छ सैन्यांची दाणादाण उडवून टाकली. म्लेच्छांच सैन्य धावू लागल. हजारोच्या संख्येने म्लेच्छांचा नाश झाला. म्लेच्छ राजाला धरून आणून श्रीरामाने जनकापुढे उभे केले.

श्रीरामाचा हा प्रराक्रम पाहून जनक खूष झाला होता व तेव्हांपासूनच श्रीरामाला आपली मुलगी द्यावी असे त्याने ठरविले होते; पण स्पष्टपणे त्याने कधीच बोलून दाखविले नव्हते.

याच युध्दाच्या प्रसंगाच्या निमित्ताने श्रीरामाने सीतेला पाहिले होते. तिचे दिव्यरुप, तिचा बाणेदारपणा, तिचे सामर्थ्य आणि तिची सौजन्यवृत्ति त्याने अवलोकली होती. रामाला ते सौंदर्य फारच आवडल होत. रामाच्या मनात सीतेसंबंधी प्रेमाची भावना उद्‌भूत झाली होती; पण त्यान ती बोलून दाखविली नाही. अशा रितीने जनकाने जरी सर्व राजांना स्वयंवरा त्त्रिका पाठविली होती तरी मुहात हेतू एकच होता. तो म्हणजे कुणालाहि नाखुष न करता सीतेला श्रीरामाला वरता यावे.

स्वयंवर ठरले. स्वयंवराचा मंडप उभा राहू लागला. हजारो माणसे दिवसरात्र खपू लागली. मिथिलानगरी एखाद्या नववधुप्रमाणें सजू लागली तोरण, गुढया, पताका, झालरी यांनी

शहर शोभू लागले. गावोगावीचे राजकुमार येऊ लागले. आज हा अमुक देशाचा राजकुमार आला तर उद्या अमुक देशाचा राजकुमार येणार याची गांवभर चर्चा चालू असे. देशोदेशीचे वैभव जणू मिथिलेच्या मार्गाने वाटचाल करीत होते. नगर नुसत कमळासारख फुलल होत.

श्रीराम व लक्ष्मणही या स्वयंवराला आले होते. या स्वयंवराचे वैशिष्टय म्हणजे तेथे एक दिव्य धनुष्य ठेवलं होत. जो कोणी ते उचलून त्याला बाण लावील त्याला सीता वरमाळ घालणार होती. सर्व राजपुत्रांत श्रीराम जरी सुन्दर असला तरी तो कुमार वाटत होता. त्याचे बालपण अद्यापी विरघळले नव्हते. त्यामुळे इतर राजकुमारांचे लक्षच श्रीरामाकडे नव्हते. नेहमीप्रमाणे सर्वांचा परिचय झाला. एका दासीनं रामाची ओळख सीतेला करुन दिली. जेंव्हा ती श्रीरामाजवह आली तेंव्हा सीता लाजली होती. रमाकाडे पाहण्याचे तिला धैर्य झाले नाही. तिच्या चित्तवृत्ती बहरल्या होत्या. सूर्याच्या कोवळ्या किरणांनी कमलिनी उमलावी त्याप्रमाणे सीता उमलली होती. तिचे गाल लाल झाले होते.

स्वयंवर सुरु झाले. अनेक पराक्रमी राजांनी ते धनुष्य उचलण्याचा पराक्रम केला. पण व्यर्थ. मोठया उत्साहाने ते धनुष्य उचलण्याचा प्रयत्न करीत पण थकून-भागून आपल्या जागेवर येऊन बसत. बराच वेळ हा खेळ चालू होता. अनेकांच्या आशा कोळपल्या होत्या. धनुष्यांची अट नसती तर सीतेला त्यांनी पळ्वून नेलें असते. सर्वांचे आकर्षण एकच होते ते म्हणजे सौंदर्य आणि त्यासाठीच हे सारे जमले होते. पण श्रीरामाचे आकर्षण एकाच जन्माचे नव्हते. श्रीराम व सीता अनेक जन्मात पति-पत्नीच रुपानं राहात आले होते. तेव्हां जन्मोजन्मीचे जे आकर्षण असते ते तीव्र असते. शिवाय माणस जे चिंतत असतो त्याप्रमाणे घडून येतेच असे नाही. या जगड्व्याळ चक्रनेमिक्रमात नियति-कर्म यांचाहि हात असतो. म्हणूनच सीतेचे लक्ष रामाने वेधून घेतले.

श्रीरामाची पाळी आल्याबरोबर ते धनुष्याजवळ गेले. त्यांनी आई-वडीलांना मनांत नमस्कार केला. मग वृषभतीर्थकारांना नमस्कार केला आणि धनुष्य उचलला. इतर राजे केवळ विस्मित झाले. रामाने क्षणार्धात ते धनुष्य उचलून त्याला बाण लावला व तो बाण आकाशात

सोडला. प्रचण्ड आवाज करीत तो बाण आकाशाच्या दिशेने निघाला. सर्व राजांनी श्रीरामाचे कौतूक केले. सीतेने रामाच्या गळ्यांत सुंदर, सुवासिक पुष्पांची माला घातली. जणुं एक सुंदर मोती सोन्याच्या कोंदणांत जाऊन बसला होता. सीता सुखावली होती. जन्मोजन्मीचं तिचं स्वप्न याहि जन्मांत पूर्ण झालं होतं. पराक्रम आणि सौदर्य याचीच ती युती होती. पावित्र्य आणि मांगल्यच जणुं एकत्र आले होते. राजा जनक धन्य झाला होता. त्यांन मोठया उत्साहानं लग्नसोहळा पार पडला. असं म्हणतात की या सोहळ्यांत प्रत्यक्ष स्वर्गीय देवदिकानीही भाग घेतला होता. पुण्यवंताच्या जीवनांतील घटनाच अशा असतात की सामान्य माणसाला त्यातील कार्य-करणांचा उलगडा होत नाही.

याच सुमाराला श्रीलक्ष्मण इत्यादी तींनही बंधुना ज्या राजांनी प्रत्यक्ष पाहिले त्यांनी आपल्या मुलींची लग्ने त्याच्याशी लावून दिली होती. एका सोहळ्यात अनेक सोहळे साजरे झाले होते. अयोध्या आकण मिथिला ही शहरे या निमित्ताने अनंतकाळपर्य्‌त सांधल्या गेली होती. अध्यात्म आणि पराक्रमाच यांचा मधुर मिलापच जणु भारतीय संस्कृतीत घडला होता. शत्रुंच्या निर्दालनात खरंखुरं अध्यात्म कधीच आड अलं नव्हतं. अहिंसा; अपरिग्रह ही तत्त्वे भारतीय संस्कृतीत नेहमीच बलवानांची शस्त्रे व शास्त्रे होती. युध्दाला भारतीय संस्कृती कधीच घाबरली नव्हती. दुष्ट प्रवृत्तीचं निर्दालन हेच भारतीय संस्कृतीचं अनिवार्य्‌ असे अभिष्ठान आहे. म्हणूनच मिथिला आणि आयोध्या यांची ही युति म्हणजे अहिंसा आणि पराक्रम यांचीच युती होती.

अयोध्येत अनंदीआनंद झाला. श्रीरामादिकांची लग्ने झाल्यामुळे त्यांच्या आई प्रभुदित झ ााल्या होत्या. मुलांचे संसार उभे करण्यांत कोण धन्यता वाटते मातांना ! सुनमुख बघण्याची किती आतुरता! ते सौख्य आता पूर्ण झाले होते. श्रीदशरथ अत्यंत भाग्यवान म्हणूनच हे घडले असे अनेक राजे बोलून दाखवित असत. आणि दशरथाच्या जीवनातील हाच प्रसंग भाग्याचा होता. पण हे भागय कुणाला पहावतं का? नियति अशी वस्तु आहे की तिचा पत्ताच लागत नाही.

आणि एकेदिवशी अत्यंत सुंदर दिसणाऱ्या या घरातील आनंद, चैतन्य, उल्हास मावळून काळ्वंडू लागला. दैवदुर्विलास तो. पण यावेळी जे घडते ते चुकविण्याचे समर्थ्य कुणालाही

नसतं.  प्रत्यक्ष सूर्यच ग्रासला जाऊ लागला तर त्यांच रक्षण कोण करणार ? समुद्रच रिता झाला तर तेथे त्याची पूर्ति कोण करणार? नेमकी तीच गोष्ट पद्मपाणि रामाच्या कुलांत घडणार होती.

श्रीरामांच वय लक्षांत घेऊन दशरथानं विचार केला की भारतीय संस्कृतीप्रमाणे पित्यानं वनवासाचा मार्ग स्विकारावा व वयांत आलेल्या मुलाला राज्यपद द्यावें हे स्वप्न साकार करण्यासाठीच महाराज दशरथानं एवढा काळ नव्हता का कंठला! आपल्या सुयोग्य पुत्राच्या हाती आपण निर्माण केलेलं सर्व सोपवायच आणि स्वत: सर्वसंग परित्याग करुन वनांत जाऊन आत्मपूजेचा, आत्मदर्शनाचा, आणि आत्मोपलब्धिचा मार्ग धुंडाळायचा! हीच नव्हती का आदर्शपरंपरा! भोग आणि वैराग्याची इतकी सुंदर परंपरा कोणत्या सस्कृतीत आहे? उपभोगाच्या सामर्थ्याशिवाय भोगाची लालसा करणारा कमकुवत व दुर्बल आजचा समाज पहिला म्हणजे संस्कृति कुठे कुठे कुजत चालली आहे हे लक्षांत येते.

महाराज दशरथानं आपल्या मनांतील हेतु रामाला बोलावून समजाऊन सांगितला.  ते म्हणाले,  प्रिय वत्सा, जीवनाचं अंतिम ध्येय असतं आत्म-साधना! धर्म, अर्थ आणि काम या तीनही पुरुषार्थांची मी आतापर्यंत साधना केली.  तुमच्या जन्मान माझं कुळच नव्हे तर मीच पावन झालो आहे.  मी खरोखरच इतक्या सत्वगुणी मुलाचा पिता व्हायला लायक नाही राज्य करतांना अनेक तामसी प्रवृत्तींना मी बळी पडलो.  अन्यायाचीही पर्वा केली नाही त्याचा मला आता पश्चाताप होतो.  परंतू आता याचा विचारच नको.  बाळा, माझ्याकडे असा पाहू नकोस.  तुझ्या हृदयातील मांगल्य, पावित्र्य, ममता यांचा अणुरेणु माझ्यात नाहीं.  पण मी आता थकलो आहे. माझं मन आता या राज्यकारभरांतून पूर्ण विटलं आहे परवाच एका जैनमुनींनी मला धर्मप्रवृत्त केलं.  मुला, राज्य सोपवून मी वनांत जाऊन आत्मसाधना करणार आहे.  तुम्ही सारे ज्या प्रेमाने आजवर राहात आलात तसेच राहा.  कुळाचं शील सोडू नका.  मी आता सारा भार तुझ्यावर सोपवणार आहे.  असं म्हणत असता श्रीदशरथानं रामाला हृदयाला लावलं.  जणु त्याला वाटत होतं की त्याच्या रामाला कुणी दुर ओढत होतं.  आसवांची माळ त्याच्या डोळ्यातून ओघळत होती.  खरं पाहिलं तर हाच खरा राज्याभिषेक होता.  पिता आपल्या ममतेचे चार आश्रु ढाळून

मूकपणें आपले सारे सामर्थ्यच जणुं मुलाला देत होत. कुणीही हे दुश्य पहिले असते तर त्याचं हृदयही पाणावलं असतं.

त्यावर श्रीराम म्हणाला, पिताजी, हे काय? आपल्या डोळ्यात अश्रु! आपणाला कांही दु:ख आहे का?

श्रीदशरथ म्हणाले, वस्ता, हे आनंदाचे आश्रु आहेत. म्हातारपणी हेच आमचे सामर्थ्य नाही का? नाता काय शिल्लक राहिलं आहे. वासना तृप्त झाल्या, अहंकारावर निखारा पडला. तुझ्या मांगल्यपूर्ण चेहऱ्याला पाहिलं की का कोण जाणे मी भयभीत होतो, मनात नाही नाही त्या शंका येतात. माझं वैराग्यपूर्ण जीवन आनंदपूर्ण होईल का? तुम्हां साऱ्यांना सोडून मी राहणार आहे पण मी तुम्हांला, घराण्याला सुखात ठेवून बाहेर पडू शकेन का याचीच मला काळजी वाटत आहे.

असा संवाद फार चालला होता. श्रीरामाला राज्यभिषेक करण्याची गोष्ट दशरथ बोलला होता. आमा उद्या राज्यसभेंत प्रत्यक्ष त्याची वाच्यता करावयाची होती.

राज्यभिषेकाची दुदुंभी, श्रीरामाला राज्याभिषेक होणार, घोषणा अधिकृतपणें राजदरबारात आली, मोठया उत्सवाची तयारी केली. शुभमुहूर्तावर राज्याभिषेक करण्याची वेळ व दिवस निश्चित करण्यांत आला. दिवस व वेळ निश्चित करण्यासाठी राज्यज्योतिषाला पाचारण केलं गेलं, तास दोन तास बसून त्याने उत्सवाचे मुहुर्त पाहिले. श्रीरामाच्या कुंडलीशी राज्यभिषेकाचा संबंध जुळेना. बराच वेळ झाला पण ज्योतिषी कांही बोलत नाही. हे पाहून दशरथ म्हणाले, तुम्ही असे चिंताक्रांत का? कांही विध्न वगैरे आहे का? का मंगल मुहुर्तच नाही!

महाराज, ज्याला आपण राज्यभिषेक करणार आहात त्याचा कुंडलीची वेहच जुळत नाही. श्रीरामाच्या कुंडलीत इतक्या लवकर राज्याभिषेकाची कांहीच चिन्हे दिसत नाहीत. केवळ राज्याभिषेकाचाच मुहूर्त हवा असेल तर तो आहे.

ठीक आहे. तोच मुहूर्त काढा, श्री दशरथराजे किंचीत् खेदखिन्न होवून म्हणाले.

ज्योतिषी निधून गेल्यावर मात्र श्रीदशरथ फारच थकले. काहीतरी विघ्न येणार हे खरे. पण नेमकेकाय होणार आहे हे मात्र समजले नाही. श्री दशरथ राजाने ही गोष्ट मात्र कुणास कळू दिली नाही.

राज्यभिषेकाची तयारी जोरात सुरुं झाली. देवळादेवळांतून पूजा, अभिषेक, जाप्ये चालू झाली. वेगवेगळ्या विघ्नविनाशासाठी लागणारे पौरुष नसले म्हणजे इतर बाहय उपचारांनी काय होणार?

कैक्रयीला दु:ख झालं ते दशरथराजे विरक्त झाले म्हणून. कैक्रयीला माहित होतं की, दशरथाच्या विरक्तीत सामर्थ्य किती आहे! ज्यात भोगाचं सामर्थ्य असतं त्यांच्यातच विरक्तीचं सामर्थ्य असतं. आणि ते सामर्थ्य कुणी हाणून पाडू शकत नाही. दशरथाचे ह्दय जिंकून घेणारी एकेच व्यक्ति होती. ती म्हणजे कैक्रयी. असाधारण माधुर्य तिच्या वाणीत होतं अत्यंत चाणाक्षही होती ती ; पण आज ती दु:खी होती. याचवेळी तिचया मनांत एक विषबिंदू टाकणारी तिची आवडती दासी होती मंथरा तिनें श्रीरामाऐवजी भरताला राज्य मिळावं, असा विचार तिच्यापुढे मांडला. पण सुरुवातीला तिनं तो अमंगल
म्हणून झिडकारू न टाकला होता. भरतापेक्षा रामावर तिचं प्रेम अधिक. पण पुत्रासाठी मातेचं कांही कर्तव्य असतच की नाही. राज्यपद मिळालं तर मी राजमाता ठरणार होती प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रेची तिच्या हाती येणार होती.

वरील विचारच तिच्या मनांत प्रबल होत गेला. पतिपेक्षां पत तिला महत्वाची वाटू लागली तिचा विवेक नष्ट झाला.

तिनं आपले कुटिल डावपेच सुरू केले. दशरथ तिच्या डावपेचाला बळी पडेलच अशी योजनाच होती. राज्याभिषेकाची तयारी होत आली. परवा राज्याभिषेक होणार! रामाची कौसल्या म्हणजेच आपली सवत राजमाता म्हणून मिरवणार! यामुळे ती आणखीनच डिवचली गेली. स्त्रियांचा स्वभावच मत्सरी असतो मत्सराच्या अग्नीने पेटलेली स्त्री साऱ्या जगाच्या नाश ओढवला तरी गप्प बसत नाही. त्यांत भर घातली मंथरेनं आणि मग तिच्या सवती-मत्सराच्या भडका उडाला.

तिला आठवलं की श्री दशरथ राजानी तिला एक वर देऊ केला होता. हीच वेळ योग्य आहे दशरथाकडून स्वार्थ साधून घेण्याची. जिनं जन्मात प्रेमाशिवाय कसलाच व्यवहार दशरथाशीं पाळला नाही, ती आज केवळ पुत्रवात्सल्यानं म्हणा किंवा मत्सरानं नवऱ्याचे सारे बेत ढासळून पाडणार हाती. तिच्या मनांत अहंकार, कुटिलता आणि मायाचार यांनी नुसतं ठाण मांडलं

वर काय मागायचा, या विचारात ती बसली होती. आपण आपल्या लाडक्या भरताला राज्यपद मागावं; पण भरत अगधी रामवेडा आहे. वडील भावाला सोडून तो कांही हे स्वीकारणार नाही अगदी त्रागा करील. नको ते राज्यपद म्हणून वैराग्याच्या गोष्टी देखील करील. भरताचं मुळी रामाव्यतिरिक्त प्रेमच नाही कुणावर ! असलंच प्रेम तर ते आहे वैराग्यावर आणि माझ्या डोळ्यापुढ भरताची मूर्ति येण्याऐवजी सारखी रामाचीच मूर्ति यते. कसा छान आहे! आई म्हणून जेंव्हा तो वंदन करतो तेंव्हा माझ्या मनांत कसा मातृप्रेमाचा पान्हा फुटतो. नाही तरी त्याच्या बोलण्या-चालण्याचा प्रभावच पाडतो मुळी. सारा रागच निघून जातो त्याचा येण्यानं माझ निर्धार तरी कायम राहणार आहे का? राम डोळ्यासमोर असला म्हणजे मला देखील त्याच्याविरुध्द कांही बोलता येणार नाही. त्याच्या दर्शनानं केवळ माझ्यांतील हे बळेच आणलेले अवसान तरी टिकणार आहे का? छे: छे: मला कांही जमणार नाही.

असा विचार चालू असतां मंथरा आली. कसला विचार करता ? -ती म्हणाली.

अग कसले वर मागायचे नी काय? नकोच मला ते. भरत गादीवर असला काय नि राम असला काय? मला तर दोघेही सारखे आहेत. राम दिसला नाही एखादे दिवशी तर मी जेवत नाही. मी देखील उगीचच भरताला राम-वेडा म्हणते. पण खरं पाहिलं तर मी तरी कोण आहे? मी देखील रामवेडीच.

राणीसाहेब, तुमचं मन असं कसं अस्थिर ! राम हा योग्य असला तरी सवतीचाच मुलगा. राम चांगला असला तरी राजमाता म्हणून कांही तुम्हांला मिरवायला मिळणार नाही?

शिवाय आपले नाथ श्रीदशरथ राजे लवकर दीक्षा घेऊन, संन्यासी होऊन वनांत जाणार आहेत. रघुकुलाची रीतच आहे ही ! मुलांना राज्य देऊन वडिलांनी आत्मसाधनेसाठी जंगलात जाऊन राहायचं. दशरथ राजे याला अपवाद असणार नाहीत. आज ना उद्या ते सारं वैभव सोडून निघून जाणार ! मग तुमची काय अवस्था होईल? तुम्हाला कोण विचारणार आहे? रामाचं अंतरंग तुम्हाला ठाऊक नाही. तुम्ही वर मागून घेऊन राज्य मिळवाल याची त्याला भीती वाटते म्हणूनच तो तुम्हाला कुठे ठेऊ नि कुठे नको असे वागतो, पण मुळात तो--------

मंथरे, माझ्यासमोर रामाची निंदा नको. पाहिजे तर तू मला नीच म्हण; पण रामाची निंदा माझ्या कानाला शिवू देऊ नकोस------- कैक्रयी ओरडून म्हणाली.

ठीक आहे. माझं काय जातं? ज्याचं करावं बरं, तो म्हणतो माझंच खरं! मी जाते. पुन: या बाबतीत कांही मला विचारू नका. तिकडे रामाची आणि कैासल्येचे काय काय बेत चालले आहेत ते देखील मी कांही सांगत नाही. राजे दशरथ हे तुम्हाला केवळ उपभोग्य वस्तु याच्या पलीकडे कांही समजत नाहीत. भरत तर असा भाऊक ! वडील संन्यास घेतो म्हटले तर स्वत: देखील घेईल. कधी तरी त्यानं भरजरी वस्त्रे घातली आहेत? नेहमी आत्मा आणि आत्म-कल्याण! या वयांत त्याला संन्यासी बनवून टाक म्हणजे तुझा वंशही संपला म्हणून समज! कैक्रयी ही वेळ अविचाराची नाही. नीट कान देऊन ऐक. या वेळी जर तू कांही चूक केलीस तर तयाचे परिणाम जनमोजन्मी तुला भोगावे लागतील. आयते वर देऊन बसले आहेत, ते घे मागुन. आणि तुला वाटतं, तू वर मागिलतल्यावर तो वर तुला सरळ सरळ मिळेल ! दशरथ राजे मूर्च्छित

पडतील मूर्च्छित ! मग सारे नाटक चालू होईल. जगभर तुझ्या बगदकीर्तीचा डांगोरा हेच लाक पिटतील. रामाच्या राज्यपदाविषयी तुला एका शब्दानं तरी विचारायचं होतं? तुझं रामावर एवढं प्रेम ! पण त्यानं तरी तुला सांगितलं कधी? आंतली खलवतं अशीच असणार! तू आहेस भोळी---- एक उपभोग्य वस्तु! केवळ या सुन्दर देहाच्या उपभोगाशिवाय दशरथानी तुला दिलं तरी काय आहे? सांग तरी मला?

कैकयी मंथरेच्या चिथावणीने बेछूट झाली. तिच्यात संगतीनं तिनं वर कोणता मागायचा हे ठरविले. दशरथाला कसे समजाऊन सांगायचे हेहि निश्चित केले.

दशरथाकडं निरोप आला की राणी कैकयीची प्रकृति ठीक नाही. ती मुर्च्छित झाली आहे. हे ऐकून तो घाबरू न गेला. थोडयाच वेळात तो कैकयीच्या राजमहलात उपस्थित झाला. सर्व महालात औदासिन्य भरले होतं. कैकयी एका पलंगावर अस्ताव्यस्त पडून होती. तिचे डोळे खोल गेल्यासारखे दिसत हेते. केस विसकटलेले होते. दासी तिच्या अंगावर गुलाबाचे पाणी शिंपडत होत्या.

राजे आल्यावर दासी बाजूला झाल्या. दशरथानं तिचं डोकं आपल्या मांडीवर घेतलं हळूवारपणें तिला लाडानं हांक मारली तिनं डोळे किलकिले केले. राजा दशरथाच्या मांडीवर ती सुखावली. खरं म्हणजे मंथरेनं शिवविलेला पाठ ती विसरुन देखील गेली होती. निष्पाप मनाच्या कैकयीला यापलिकडे कांही नको होते. राज्य नको, भरत नको. फक्त दशरथ हवा होता तिला.

दशरथानं विचारलं, प्रिये, तुझी अवस्था कशानं झाली? तुला कुणी काही बोललं आहे का? तुझा कोणी अपराध केला आहे कां?

कैकयी म्हणाली, होय. माझ्यावर अन्याय झाला आहे. मी त्रस्त आहे. संचित आहे. माझी वंचना चालवली आहे. मी एकदम परकी आणि पोरकी झाली आहे.

कोणी केलं तुला परकी आणि पोरकी! कोण आहे तुझ्या सौख्यात माती कालवणारा त्याचं नाव तरी सांग!

काय करुं सांगून ! तो माझा प्रिय आहे. माझा आवडता आहे. दोष तरी कुणाला देऊ मी?

कोण प्रिय ? मी-------तुझा लाडका दशरथ ? काय केलं मी? कोणतं दु:ख दिलं मी?

दिलं नाही. द्यायचं ठरवलं आहे. मला कळलं आहे की, रामाला राज्यपद देण्याचं तुम्ही ठरविलं आहे.

अग, मग त्यांत दु:खाची गोष्ट कसली? तुझा राम, तुझा आवडता राम राजा होणार याचं तुला दु:ख होतंय् ?

मला फसवता आहात तुम्ही. तुम्ही मला मागे वर दिला होता याची आठवण आहे ना ? मला तो वर मागू द्या. म्हणजे तुम्ही फसवता कां नाही हे लगेच कळेल.

.

वर, हो खरं आहे. तुला एक वर दिला आहे मी. मागून टाक लवकर ! म्हणजे संन्यास्त झाल्यावर देता येणार नाही मला. माझ्या वचनांतून मुक्त कर मला. खरंच मी विसरू न गेलो होतो. माग, लवकर मागून घे वर आणि तू आनंदित हो. हस. माझ्या रामाच्या आनंदात तुझाही आनंद मिसळू दे. दोन कर्तव्ये बजावल्याचे सुख माझ्या या म्हाताऱ्या मनाला लाभू दे.

तेच मी म्हणत आहे. समाधि-मरणाच्या वेळी तुमच्या मनांत विकल्प नको म्हणून तुम्ही आताच तो वर मला देऊन टाका, पण आधी वचन द्या की नाही म्हणणार नाही.

लाडके, रघुकुलाविषयी आजपर्यंत कुणातरी शंका घेतली आहे का? शब्दासाठी प्राण वेचणारे शेकडो राजे, महाराजे, चक्रवर्ति या कुळात जन्मले. भगवान ऋषभनाथांची ही परंपरा

नाही का! तू मागशील त्याची पूर्ति मीच काय पण माझ्या अणुरेणूचे अवशेष जोपर्यंत या मातीत राहतील तोपर्यंत तुझे वर पूर्ण होत राहतील. दुष्टांचा दुष्टपणा घालविण्यासाठी भयंकर आपत्ति आली तरी भारतीय संस्कृतीने ती झेलली आहे.  मरणाच्या वर्षावातहि सत्व न सोडणारी दिव्य परंपरा आहे आमच्या कुळाची, आमच्या भूमीची आणि आमच्या रक्ताची ! बलिदानाचे बाळकडू प्यालेल्या रक्ताला रक्ताला आजच असं आव्हान करायला काय झालं आहे तुला ! कैक्रयी, वर फेडण्याचे सामर्थ्य माझ्यात उरले नाही तर माझ्याच रक्तामांसाची माझी लेकरे ते कार्य पूरे करतील.  सांग तरी तुझी काय इच्छा आहे ! उघड उघड सांग.  कुळाच्या परंपरेला साजेल असं सांग ! पण रघुकुळाच्या सत्वाला आव्हान देऊ नकोस.

कैक्रयी मुळचीच सात्विक होती.  पण स्वार्थ आणि अविवेक यामुळं तिचं मन तिला अशांत झालं होतं.  आपल्या लाडक्या भरताला, राज्य यिळालं तर तिला नको होतं असं नाही.  भरत राजा झाला तर काय होईल, याची स्वप्ने तिला पडली असणें अगदीच अशक्य होतं असं नाही. रामावर तिचं प्रेम होतं; पण भरताचं अन् तिचं रक्ताचं नातं होतं.  भरताला राज्यपद मिळावं हे तिला तितकसं तिव्रतेनं वाटावं याचं कारण वेगळं होतं.

भरताची मूळची प्रकृति अत्यंत शांत आणि गंभीर.  जगाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन उदासीन होता.  अनेक सहवास त्याला लहानपणापासून घडत आला होता.  त्या मुनींच्या खडतर तपश्चर्येचा, त्यांच्या धर्ममय जीवनाचा, त्यांच्या अंतर्मुख दृष्टीचा परिणाम न कळत भरतावर झ ालेला होता.  भौतिकतेचे बाहय स्वरू प अत्यंत सुन्दर असले तरी ते विनाशी आहे.  खरे दिव्यत्व, खरे सौन्दर्य, हे अन्तर्मुख होण्यात आहे असे त्याला वाटत होते.  म्हणूनच राजाधानीत फारसा मुक्काम तो करीत नसे.  तीर्थयात्रा व मुनिदर्शन याचे त्याला फार वेड होते.  आपल्या रू प-यौवन-संपन्न मुलाने क्षत्रियोचित उपभोग धर्माचा आश्रय न करता मुनिधर्माची चर्चा करावी, संन्यास घेण्याच्या गोष्टी कराव्या याचे तिला तरी अगोदर कौतुक वाटले असले तरी तिच्या मनांत काळजी निर्माण करणारी ती गोष्ट ठरली.  आईचं वात्सल्य हे नेहमीच विवेकी ठरतं असं नाही. पुत्रमोहानं व्याकुळ झालेली म्हणजे या भूमीला मिळालेला तो अभिशाप आहे.

एकदा भरत तिला म्हणाला होता, गृहस्थी जीवन व्यतीत करण्यापेक्षां साधुजनांचा मार्ग स्विकारणे किती श्रेयस्कर आहे. संसारात पोटासाठी लाचार होणारी, हिंसंसाठी प्रवृत्त होणारी, दुसऱ्यांच्या सुखावर निखारा ठेवणारी माणसे पाहिले म्हणजे मुनिजनांची जगण्याची रीतच किती आदर्श आहे, त्याचे प्रत्यंतर येते. ईर्ष्या, असूया, द्वेष, मत्सर आणि स्वार्थ यांनी बरबटलेल्या या मानवी जीवनाचे त्याने इतके भयानक चित्र रेखाटले की, कैक्रयीला देखील क्षणभर या जीवनाचा उबग आला. तसे पाहिले तर दशरथाच्या भोगासक्त जीवनापलीकडील आदर्श जीवन तिला पहायला मिळाले नव्हते. दशरथाने कैक्रयीच्या शारिरीक सौंदर्याचा उपभोग घेण्यापलीकडे काय केले होते? ही मेदिनी, ही वसून्धरा जणू आपल्या सारख्या पराक्रमी माणसांच्या उपभोगासाठीच आहे या कल्पनेव्यतिरिक्त आदर्श जीवन जगण्याचा त्याने कधीच विचार केला नव्हता. या गोष्टीची कैक्रयीला तीव्र आठवण झाली. आपला भरत कुणीकडे आणि दशरथ कुणीकडे ! राज्य मागितले तर भरताला गुंतविता येईल. तिचा लाडका भरत संन्यासी होणार या कल्पनेला खोल खोल पुरू न टाकायला हा तोडगा बरा होता. भरताच्या वियोगाची कल्पनाच सहन कराचला तिचे मन तयार नव्हते. भरताशिवाय जणू ती कशाचाच विचारच कराचला तयार नव्हती.

ती दशरथाला म्हणाली, हे आव्हान आहे, असे समजण्यांचे कारण नाही. तुम्ही वर दिला होता त्याची पुर्ति करणं तुम्ही परमपवित्र कर्तव्य मानीत आहांत. मी तुमची आवडती राणी आहे. माझं सर्वस्व मी तुम्हाला अर्पण केलेलं आहे. तुमच्या सुखात सुख आणि दुःखात दुःख मानलं आहे. माता बनण्याचं भाग्य तुम्ही मला दिलं आहे. माझ्या ह्रदयात मातृत्वाचं दूध निर्माण केले आहे. त्या दुधाची शपथ देऊन आज मी माझ्या मनांतील एक इच्छापूर्ण व्हावी म्हणून याचना करीत आहे. आपण आपल्या लाडक्या भरताला रांज्याभिषेक करावा, हीच ती माझी इच्छा आहे.

दशरथाला सहस्त्र इंगळ्या डसल्यासारखे झाले. त्याला घेरी आली. सारं जग फिरत आहे असं त्याला वाटू लागलं. मन अगदींच सुन्न झालं. तसं पाहिलं तर राम किंवा भरत काय, त्याचीच मुले! पण त्यानं जे ठरवलं होतं ते रघुकुलांतील रीतीला अनुसरू न. ज्येष्ठ मुलाला राज्य न देता ते भरताला द्यावं हे पटेना! शिवाय रामाला राज्य द्यायचं त्यानं इरवलं होतं, मुहुर्त काढला होता. तयारी केली होती.

दशरथाला थोडी शुध्द येताच तो म्हणाला, लाडके, तू आतां शुध्दीवर आहेस ना ! राम आणि भरत यांच्यावर तु जे प्रेम केलं त्याचेच हे प्रदर्शन आहे का? दशरथाच्या म्हातारपणी त्याची जगानं छी: थू करावी, त्याच्या लौकिकाला काहिमा फासावा, त्यानं मिळविलेली कीर्ति धुळीस मिळावी, त्याचा पराक्रम असा मलिन व्हावा हाच का विवेक. कैक्रयी, तुझ्यासाठी मी काय केलं नाही? लहान असून तुला पट्टराणी पद दिलं? नाही नाही ते ऐश्वर्य तुझ्या चरणावर ठेवलं. तुझ्या तोंडून शब्द निघायचा अवकाश कीर तो शब्द पूर्ण करण्यासाठी सारे सामर्थ्य आणि ऐश्वर्य पणाला लावले. सांग काय केले नाही? तूझ्यासाठी अनेकांची गैरमर्जी पत्करली. इतरांना जे सुख मिळू शकलं नाही त तूझ्या सेवेत अर्पण केले. पण तू ते सर्व विसरू न असला कसला वर मागतेस.

मला वाटलंच होतं की तुम्ही असं म्हणणार. भरत तुमच्या डोळ्यात सलत ं आहे. कधी तरी त्याला प्रेमानं तुम्ही जवळ केलं आहे कां? केवळ माझ्या सौंदर्याला भुलून तुम्ही मला इथं जागा दिली. हे सौंदर्य नसतं तर तुमच्या महालातील दासीहि आपण केली नसती मला. तुमच्या दृष्टीत केवळ उपीभोग होता. आजहि त्याच्या पलिकडे माझी किंमत नाही तुम्हाला. माझ्या सौंदर्याच्या लालसेनं तुम्ही सारे करीत आला आहांत. पण तुमचं म्हातारपणा आता उपभोगाच्या आड येऊ लागलं आहे. तुम्ही मला टाळत आहात. भरत हा तुमचाच मुलगा आहे ना? रघुकुलाची रीत तुम्हाला इथेच आठवावी ना ! मला वर देताना ती रीत आठवली नाही का ? रघुकुलाला शोभेल असे कोणते आचरण तुम्ही केले आहे. सोन्यासारख्या भरताबद्दल कधीच तुम्हाला आपुलक ी नाही.........

असं कसं बोलतेस, कैक्रयी ! मला चारहि पुत्र माझे वाटतात. रामाच्या मोहानं मी वेडा झ ालो आहे असे नाही, माझ्या चारहि पुत्राबद्दल मला आदर आहे. त्यांचा पिता होण्यांत मी स्वत:ला धन्य मानतो. मी असं कधी म्हणालो की, मी रघुकुकालाच्या आदर्शला पात्र ठरलो आहे! पण माझ ा राम काय म्हणेल? तू भरताला राज्य मागत आहेस हे त्याला कळताच तो ते आनंदाने मान्य

करींल.  रामाला भरताबद्दल जे वाटतं ते मी काय सांगू. कैकयी, तूच तर रामाला इतका मोठा केला. तुझ्या मायेच्या सावलींत तो वाढला.  मग त्याच्या सुखाच्या आड...

मला असं भावनेच्या डोहात नेवू नका.  माझा वर मी मागितला.  तुमच्या कूलाला शोभेल तसं तुम्ही वर दिला नाही तर मी बळजबरीने कां तो घेणार आहे ! एका मातेला जे आपल्या मुलाबद्दल वाटते ते स्पष्टपणे सांगितले तर तिचा काय दोष! आपल्या मुलाच्या कल्याणासाठी झटावं म्हणूनच मी त्याची आई झाले आहे ना? तूमच्या रामाला हे राज्य सोडून जा असं तरी मी सांगत नाही ना?

कैकयी माझ्या जीवन-मरणाचा हा प्रश्न आहे.  वाटेल ते कर आणि तूझा हा वर परत घे. राज्याभिषेक रामालाच व्हावा हा माझा निश्चय आहे.

मला वाटले होतेच की, तुम्ही रघुवंशीय लोक असेच निश्चयी असतां.  एका स्त्रीला दिलेला वर तुम्हला पूर्ण करतां येत नाही.  रघुवंशाला आतां शेवटचे दिवस आले आहेत असे मला वाटते. रघुकुलाच्या रीतीप्रमाणें संन्यास घेण्यापूर्वी सर्व प्रकारच्या ऋणांतून राजाने मोकळे व्हावे लागते.  तुम्ही संन्यास घेऊन जंगलात गेल्यावर माझी आणि माझ्या भरताची काय गत होईल याचा आपण कधी विचार केला आहे कां? माझा वर आपणाला पुर्ण करता येत नसेल तर तुमची रामराज्याभिषेक ाची कल्पनाहि मी तडीस जाऊं देणार नाही.

अशा रीतीने दीर्घकाळपर्यंत चाललेले भांडण रामाच्या कानावर कुणीतरी घातले.  पुज्य पिताजींची इच्छा आणि कर्तव्य यांच्यात कुणाला मान द्यावा हे रामाला कळेना.. कैकयी प्रिय तर होचीच; पण तिने भरतासाठी राज्य मागावे यात वावगे कांहीच नव्हते.  रामाने क्षणभर विचार केला आणि तो कैकयीमातेच्या राजमहालात जायलां निघाला.  दैवी घटनाच अशा असतात, की त्याला बांध घालण्याचे सामर्थ्य कुणांहि नसते. मानव जो विचार करतो तो तडीस जातोच असे नाही. श्रेयांसि बहु विघ्नानी  असे जे म्हटले आहे ते अशा वेळी खरे वाटते. आपल्या चालू जीवनाच्या नियंत्रणात मागील जीवनाचाहि हात असतो.  आपण जे ठरवितो ते तसे घडू नये यासाठी कोणती तरी कारणपरंपरा कार्य करीत असते.

श्रीराम महालात आल्यावर कैक्रयीने आपले विचार रामाला ऐकविले. राम म्हणाला, माते, वडीलांची आज्ञाजशीआम्ही प्रमाण मानतो तशी मातेचीहि. आपणाला दिलेला वर मोहांमुळे पिताजींना पूर्ण करतांना संकोच वाटत असेल, तर हा राम तो वर पु्र्ण करीत आहे. श्रीभरताला राज्याभिषेक मी माझ्या हाताने करीन. सारेच भाऊ माझे आहेत. प्रत्येकात रघुकुलातील रक्त खेळत आहे. आपण शांत व्हावे. मी भरताला समजाऊन सांगेन. भरताचे राज्य झाले काय किंव्वा रामाचे राज्य झाले काय ते राज्य खऱ्या अर्थाने रघुवंशाचे आहे.

इतक्यात श्रीभरत तेथे आले. त्यांना ही गोष्ट कळाली. मोहाने मातेने कुलपंरपरा मोडावी आणि स्वत:साठी राज्य मागून घ्यावे, याचे त्याला फार दु:ख झाले. राज्यामुळे भावाभावात, पति-पत्नीत वैमनस्य, द्वेष, ईर्ष्या आणि असूया निर्माण होत असेल तर नको ने राज्य. अशा विचारांनीं त्याचे मन विषाद पावले.

तो म्हणाला, पिताजी, आपण वैरदाग्यवृत्तीने हा संसार सोडून संन्यासाश्रम पत्करण्याचे ठरविलेल मी ऐकले होते. तेंव्हाच मीही निश्चय केला आहे की, तुमच्याच सेवेत अरण्यांत राहून आत्म-कल्याणाचा मार्ग स्वीकारावा. जीवनातील सर्वश्रेष्ठ तत्त्व म्हणजे आत्मतत्त्व आहे. मोह, अंहकार आणि अज्ञान या पिशाच्चांनी आमच्या मनांवर मोहिनी घातली आहे. त्यामुळे खरा मार्ग दिसत नाही. खरे-खोटे कळत नाही.